.१२२८८१८८०१.

# महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
ईमेल govind.pawar@nic.in
दूरध्वनी क्रमांक ०२२-२२७९३२८९

क्रमांक:- संकिर्ण-११२०/प्र.क्र.१२/२०२१/आ (तांत्रिक)

दिनांक :-१९.०१.२०२१

प्रति,

अधीक्षक अभियंता,
जळगाव पाटबंधारे प्रकल्प मंडळ,
जळगाव.

विषय :- स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक संवर्गातील कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती/आश्वासित पदोन्नती योजनेचे फायदे अनुज्ञेय करण्यासाठी विचारात घ्यावयाच्या नियुक्ती दिनांकाबाबत.

संदर्भ :- आपले कार्यालयाचे पत्र जा.क्र./आसासंनिवजमं/आ-१०/आप्रयो/ससाप/१२९/२०२०, दि.२२.०९.२०२० चे पत्र

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन पत्रान्वये शासन निर्णय दिनांक ३१.०१.१९८९ नुसार स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या संवर्गात समावेशन करण्यात आलेल्या तांत्रिक सहाय्यक / मिस्त्री / कारकून इ. १४ निम्न संवर्गातील ज्या कर्मचाऱ्यांची प्रथम नियुक्ती ही रुपांतरित अस्थायी अस्थापना(CRT) किंवा नियत अस्थायी आस्थापना (FRT) वर झालेली आहे व त्यांचे दिनांक ३१.०१.१९८९ च्या शासन निर्णयानुसार स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदावर समावेशन झालेले आहे. अशा कर्मचाऱ्यांना तिसरा लाभ अनुज्ञेय करताना सेवेची गणना कशी करावी याबाबत स्पष्ट मार्गदर्शनपर आदेश व्हावेत, अशी विनंती आपण केली आहे.

२. सदर अनुषंगाने नमूद करण्यात येते की, स्थापत्य अभियांत्रिकी सहायकांना कालबध्द पदोन्नती/आश्वासित प्रगती योजनेचे लाभ अनुज्ञेय करतेवेळी १२ वर्षांची गणना करताना कार्यव्ययी आस्थापनेवरील सेवा विचारात न घेता रुपांतरित अस्थायी आस्थापना / नियत अस्थायी आस्थापनेवरील नियुक्तीपासून १२ वर्षाची सेवा गणना करण्यात यावी असे विभागाचे शासन पत्र दिनांक १९.०५.२०१४ मध्ये नमूद करण्यात आले आहे. सबब, सदर अनुषंगाने योग्य ती उचित कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यात यावी.

स्वाक्षरी/-
(गोविंद पवार)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

आस्था (तांत्रिक) संग्रहार्थ.